**प्रेस नोट दिनांक ०५/०६/२०१९**

## खडक पोलीस ठाणे, पुणे शहर

### गहाळ झालेल्या एम.आय. कंपनीच्या महागडया मोबाईल फोनचा शोध घेवून मालकास परत

दि.०२.०६.२०१९ रोजीचे २१.०० वा ते दि. ०३.०६.२०१९ रोजीचे ०९.०० वा.पर्यंत खडक पोलीस ठाणे अंकित मिठगंज पोलीस चौकी येथे डयुटी अंमलदार २५७९ जरांडे, बीट मार्शल पोशि ९८८३ चव्हाण असे कर्तव्यावर हजर असताना, रात्रौ ०१.२० वाजण्याचे सुमारास इमस नामे डॉ. अमित वहीकर वय ५७ वर्षे, रा. ५८६ गुरूवार पेठ पुणे यांनी कळविले की, त्यांचा एम.आय. कंपनीचा मोबाईल दि. ०२.०६.२०१९ रोजीचे १०.३० वा. कोठेतरी पडुन गहाळ झालेबाबत सांगितले. नमुद तक्रारदार डॉ. वहीकर यांचेकडुन त्यांचा मोबाईल क्र.प्राप्त करून त्यावर नमुद कर्मचारी यांनी संपर्क केला असता मोबाईल चालु असल्याचे निदर्शनास आले. नमुद कर्मचारी यांनी पुन्हा सदर क्रमांकावर फोन केला असता, सदरचा फोन हा इसम नामे शफिक फयाज शेख वय ३३ वर्षे, रा. कोंढवा पुणे यांनी उचलला सदर वेळी मोबाईल बाबत त्यांचेकडे विचारपुस केली असता, त्यांनी सांगितले की, त्यांचे कॅम्प मधील दुकान समोरील कामगार हे कोंढवा येथे भेटले व त्यांना रस्त्यात सापडलेला मोबाईल फोन असून सदरचा फोन त्यांचेकडे दिल्याचे सांगितले.

नमुद कर्मचारी यांनी इसम नमे शफिक शेख यांस सदरचा फोन हा डॉ. अमित वहीकर यांचा असून ते तक्रार देण्यासाठी मिठगंज पोलीस चौकी येथे आल्याचे सांगितले. सदरवेळी नमुद कर्मचारी पो.हवा. जरांडे व पोशि चव्हाण यांनी शफिक शेख यांना मिठगंज पोलीस चौकीस बोलावुन घेतले असता, त्यांनी तक्रारदार यांचा एम.आय.कंपनीचा महागडा फोन तात्काळ चौकीस हजर केला, तक्रारदार यांचेकडे मोबाईलबाबत योग्य ती खातरजमा करून त्यांचे ताब्यात देण्यात आलेला आहे.

